डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली. ता.दापोली, जि.रत्नागिरी.

जा.क्र/मसंकें/प्रअवा/ ५e७ /२०२२ दिनांक 2 8 FEB 2022

## जाहीर नोटिस

विषय:— वाकवली विभागाच्या कुंपणालगत वाढलेले आकेशिया वृक्ष जमिनीपासून ५ फुट उंचीवर कापणे व विक्री करणे नोटीस

उपरोक्त विषयान्वये डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली, अंतर्गत मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (वाकवली विभाग) प्रक्षेत्रावरील आंबा बागांच्या कुंपणालगत उभ्या असलेल्या आकेशिया (सुमारे २९५ झाडे) झाडांची जमिनीपासून पाच फुट अंतरावर तोड करून "जेथे आहे जसे आहे" या तत्वावर दरपत्रकादवारे विक्री करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरिता बंद लिफाफ्यामधून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर दरपत्रके दिनांक २१/०३/२०२२ पर्यत कार्यालयीन वेळेत पोहोचणे बंधनकारक राहिल. सदर दरपत्रके दिनांक २२/०३/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता गठीत केलेल्या समिती समक्ष उघडण्यात येतील. विक्री करण्यात येणारे आकेशिया वृक्ष जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दिनांक २१/०३/२०२२ पर्यत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) पाहता येतील. सदर विक्री करावयाच्या वृक्षांची तपशिलवार माहिती तसेच अटी व शर्ती व दरपत्रके भरावयाचा अर्ज मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, ता.दापोली, जि.रत्नागिरी येथे दिनांक २८/०२/२०२२ ते २१/०३/२०२२ पर्यत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९ ते दुपारी १) व (दुपारी २ ते सायंकाळी ५ पर्यत) रूपये ५००/— भरून प्राप्त होतील. तसेच आकेशिया वृक्ष खरेदी करू इच्छिणाऱ्या खरेदीदारांना दरपत्रके सादर करताना रू. २०,०००/— (अक्षरी रूपये वीस हजार मात्र) अनामत रक्कम **(Earnest Money)** धनाकर्षादवारे भरणा करावी लागेल.

- आकेशिया वृक्ष तोडण्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे:—

१. आकेशिया वृक्ष खरेदीच्या दरपत्रकाचा नमुना (मुळ) रूपये ५००/— भरून संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली येथे उपलब्ध होईल व त्याच दरपत्रक नमुन्यामध्ये दरपत्रकधारकाने दरपत्रक सादर करणे बंधनकारक आहे.
२. दरपत्रके नमुद केलेल्या तारखेस व कार्यालयीन वेळेत संबंधित विभागाच्या नमुद केलेल्या कार्यालयात बंद लिफाफ्यात जमा करावयाची आहेत. लिफाफ्यात आवश्यक ती कागदपत्रे पुरविण्यात यावीत.
३. आकेशिया वृक्ष खरेदी करू इच्छिणाऱ्या खरेदीदारांना रू. २०,०००/— (रू. वीस हजार मात्र) अनामत रक्कम **(Earnest Money)** धनाकर्षादवारे **(D.D.)** भरणा करावी लागेल.
४. खरेदी करण्यात येणारे उभे वृक्ष कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) पाहता येतील. तसेच ज्या खरेदीदाराला आकेशिया वृक्षांचा लिलाव मंजूर होईल त्यांनी आकेशिया वृक्षांची शिरी व पालापाचोळयाची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

(PTO)

५. सदर आकेशिया वृक्षांची तोड जमिनीपासून ५ फूट उंचीवर खरेदीदाराने करावयाची आहे.

६. तीन व तीनपेक्षा अधिक दरपत्रके प्राप्त झाल्यास दरपत्रके मंजूर केलेल्या तारखेस ठीक ११.०० वाजता वाकवली कार्यालयात गठीत केलेल्या समिती समोर उघडण्यात येतील. दरपत्रके उघडत असताना पात्र दरपत्रकधारकांना या प्रक्रियेत भाग घेता येईल.

७. मोहोरबंद दरपत्रकाद्वारे वाजवी किंमत न आल्यास दरपत्रक उघडल्यावर लगेचच पात्र दरपत्रकधारकांसमोर बोलीद्वारे लिलाव पध्दतीने विक्री करण्याचा हक्क राखून ठेवण्यात आलेला आहे. तोंडी बोली पध्दतीने फक्त पात्र धारकास भाग घेता येईल.

८. ज्यांची बोली केलेली रक्कम सर्वात जास्त असेल अशा खरेदीदारास आकेशिया वृक्षांची विक्री करण्यात येईल.

९. दरपत्रक उघडणे व बोली प्रक्रिया पूर्ण झाल्यावर मंजूर वृक्ष खरेदीदाराने आदेश प्राप्त झाल्यानंतर पुढील दोन दिवसात ५०% रक्कम आणि वृक्षतोड करण्यापुर्वी १००% रक्कम जमा करणे आवश्यक आहे. त्यानंतरच वृक्ष तोड करण्याचे अंतिम आदेश निर्गमित होतील. वृक्षतोडीची रक्कम रोखीने, ऑनलाईन पध्दतीने किंवा धनाकर्षाने (Demand Draft) दापोली येथील बँकेत देय असलेल्या डॉ.बा.सा.कों.कृ.वि (DBSKKV) या नावाने भरणा करावी लागेल. जर का रक्कम भरणा करण्यास खरेदीदाराने उशिर केला तर त्याची अनामत रक्कम जप्त केली जाईल.

१०.वृक्ष खरेदीदाराने वाहतुकीसाठी लागणारा शासकीय परवाना किंवा इतर आवश्यक शासकीय कागदपत्रांची पुर्तता खरेदीदाराने स्वखर्चाने स्वःत करावयाची आहे.

११.खरेदीदारास विक्री करावयाचे वृक्ष कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत संबंधित विभागाच्या प्रभारी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उचल करावी लागेल.

१२.विक्री केलेले वृक्ष घेणाऱ्या ठेकेदाराने स्वखर्चाने तोडून पूर्ण उचल आदेश झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत पूर्ण करणे संबंधितावर बंधनकारक राहील. ३० दिवसांच्या आत उचल न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल तसेच ३० दिवसांच्या आत विक्री केलेल्या वृक्षांची उचल केली नाही तर उर्वरीत वृक्षावर खरेदीदाराचा हक्क राहणार नाही.

१३.वृक्ष तोडण्यासाठी लागणारे साहित्य/मजूर/वाहने/वाहतुक व्यवस्था खरेदीदाराने स्वःत स्वखर्चाने करावायाची आहे.

१४.फक्त आकेशियाच्याच वृक्षांची विक्री करण्यात येणार असुन वृक्ष तसेच उभे असलेले परंतु अर्धवट तुटलेले आकेशिया वृक्ष जसे आहे तसे खरेदीदाराने तोडून न्यावयाचे आहेत.

१५.खरेदीदाराने पडलेली इतर जंगली वृक्ष (आकेशिया व्यतिरिक्त) त्याचठिकाणी गट लावून ठेवावयाची आहेत.

१६.तोडलेल्या वृक्षांची पूर्ण उचल करतानाच प्रक्षेत्र साफ करणे व लिलावातील वृक्षांच्या फांदया/पालापाचोळा यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे खरेदीधारकावर बंधनकारक राहील.

१७.ज्या दरपत्रकधारकाने आकेशिया वृक्ष खरेदी केलेले आहेत त्याने कामावर ठेवलेल्या कामगारांना जर का अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्यास संबंधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी खरेदीदाराचीच राहील. त्यासाठी हे कार्यालय जबाबदार असणार नाही.

१८.कामाच्या कालावधीत खरेदीदाराच्या कामगाराकडून/मजूराकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास संबंधित नुकसानीची किंमत खरोदीदाराकडून वसुल करण्यात येईल

आणि त्याबाबत खरेदीदारावर कायदेशिर कारवाई करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल.

१९. खरेदीदाराने विक्री केलेल्या वृक्षांची संपूर्ण उचल केल्यानंतर अनामत रक्कम (Earnest Money) संबंधितास परत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

२०. सदरच्या आकेशिया झाडांच्या विक्रीची जाहिरात व अटी/शर्ती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.dbskkv.org पाहता येईल.

२१. सदर लिलाव प्रक्रिया या कार्यालयालने गठित केलेल्या समितीकडून करण्यात येईल.

२२. प्रक्रियामध्ये काही अडचणी निर्माण झाल्यास सदर विक्री प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, ता. दापोली, जि. रत्नागिरी यांनी राखून ठेवले आहेत.

२३. टपाल खात्याचे विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

२४. दरपत्रकधारकाने तीन लखोटे सादर करावयाचे आहेत. पहिला लिफाफा तांत्रिक पहिला लिफाफा तांत्रिक यामध्ये इसारा (Earnest Money) रक्कमेची पावती व इतर माहिती आधारकार्ड/पॅनकार्ड छायांकित प्रत इतर कागदपत्रे भरावीत. दुसरा लिफाफा हा व्यापारी लिफाफा यामध्ये भरलेला अर्ज फॉर्म ठेवावा. तिसरा लिफाफा हा साधा लिफाफा यामध्ये वरील दोन्हीही लिफाफे भरून हा लिफाफा व आतील दोन्हीही लिफाफे मोहोरबंद करून सादर करणेत यावेत.

संचालक,<br>
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.<br>
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

प्रत माहिती व पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी सादर...

१.मा. माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, बंदर रोड, रत्नागिरी.<br>
२.मा.संशोधन संचालक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली.<br>
३.मा. शिक्षण संचालक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली<br>
४.मा.नगराध्यक्ष, नगरपंचायत, दापोली,ता.दापोली, जि.रत्नागिरी.<br>
५.मा.ग्रामपंचायत वाकवली/पांगारी/टेटवली/सुखदर/कुंभवे, ता.दापोली,जि.रत्नागिरी.<br>
६.नोटिस बोर्ड संचालक, कार्यालय, भासुयो/कंदपिके मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.<br>
७.नोटिस एस.टी.स्टॅण्ड वाकवली, एस.टी.दापोली, एस.टी.खेड ता.दापोली/खेड.<br>
८.मा. व्यवस्थापक, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना विनंती करण्यात येते की, सदरच्या जाहिरातीस विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www. dbskkv.org) प्रसिध्दी देण्यात यावी.

प्रत माहितीसाठी...

१. प्रभारी अधिकारी,वाकवली/पांगारी/टेटवली/असोंड—सडवे/रूखी/गावतळे विभाग, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.<br>
२. श्री. श्रीकांत तांबे, लिपीक/रोखपाल, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.